ठराव क्रमांक - २६ विषय क्रमांक - ०२
दिनांक - ३१/१०/२०१७ विभाग – नगररचना व विकास
सुचक : मा.संतोष कांबळे अनुमोदक : मा.शैलेंद्र मोरे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/१८/१७३/२०१७ दि.२५/०९/२०१७

विषय - मौजे किवळे येथील स.नं.३९ ते ७१ येथील १८.०० मी. रस्त्याखालील क्षेत्राचे भूसंपादन करणेबाबत ..

विषय क्रमांक ०२ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २७ विषय क्रमांक - ०३
दिनांक - ३१/१०/२०१७ विभाग – नगररचना व विकास
सुचक : मा.शैलेंद्र मोरे अनुमोदक : मा.विकास डोळस
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/१८/१७४/२०१७, दि.२५/०९/२०१७

विषय - मौजे किवळे येथील स.नं. ७३, ७४, ७५ व ७६ येथील मंजूर विकास योजनेतील १२.०० मी. रस्त्याचे भूसंपादन करणे.

विषय क्रमांक ०३ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक - २८ विषय क्रमांक - ०४
दिनांक - ३१/१०/२०१७
सुचक : मा.सागर गवळी अनुमोदक : मा.शैलेंद्र मोरे
संदर्भ : मा.सागर गवळी, मा.शैलेंद्र मोरे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागाकडील मागासवर्गीय कल्याणकारी योजने अंतर्गत महापालिका हद्दीतील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती भटक्या जमातीच्या युवक/पुरुष यांच्या विकासाकरीता प्रपत्र अ नुसार विविध १९ प्रकारच्या अल्प कालावधीच्या व्यवसाय प्रशिक्षणांचे राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था , तळेगाव दाभाडे, पुणे ( National Institute of Post Harvest Technology, Talegaon, Pune ) या शासकीय संस्थेमार्फत माहे मार्च २०१८ अखेरपर्यंत प्रपत्र अ मधील प्रशिक्षणा समोर नमुद प्रति लाभार्थी निश्चित दराने प्रशिक्षणांचे आयोजन करण्यास व त्याकरिता येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा. सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २९ विषय क्रमांक - ०५

दिनांक - ३१/१०/२०१७

सुचक : मा.सागर गवळी अनुमोदक : मा.शैलेंद्र मोरे

संदर्भ : मा.सागर गवळी, मा.शैलेंद्र मोरे यांचा प्रस्ताव –

पिंपरी कॅम्प परिसरात मोठया प्रमाणात सिंधी समाज वास्तव्यास आहे. या समाजासाठी सदर परिसरात मोठे असे कोणतेही समाज मंदिर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने आजपर्यंत बांधण्यात आले नाही. सध्या पिंपरी कॅम्प परिसरात मोठ मोठी तीन उद्याने आहेत. साधू वासनवानी उद्यान, हेमू कलानी उद्यान, ओपन लॉन व इतर अशा स्वरुपाची उद्याने आहेत. तर लाल बहादूर शास्त्री उद्यानाचा वापर नगारिक करीत नाही. म्हणून सदर जागेवर स्थानिक नागरिकांची समाज मंदिर व सांस्कृतिक भवन बांधून देण्याची मागणी आहे. सदर परिसरात पुर्णपणे सिंधी समाज बांधवांनी व्यापून गेला आहे. सिंधी समाजामध्ये जर एखादी व्यक्ती मरण पावली असता त्यांची शोक सभा (पगडी रसम) घेतली जाते. या सभा घेताना अनेक अडचणी निर्माण होतात. खाजगी जागेवर कार्यक्रम घ्यावे लागतात. तरी सिंधी समाजासाठी सदर ठिकाणी समाज मंदिर व सांस्कृतिक भवन बांधून देण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

( सागर बाळासाहेब गवळी )
सभापती
शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/१२२८/२०१७
दिनांक : ०१/११/२०१७

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकड पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

